रविवार
www.maharashtratimes.com
मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र
महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । रविवार, १ जुलै २०१८ । पाने १८ + संवाद । शहर आवृत्ती * । ₹ ५.०० किंवा ८.०० संडे टाइम्स ऑफ इंडियासहित

# थोडक्यात

## कामगार पाल्यांना मार्गदर्शन

कामगार पाल्यांसाठी राज्यात लवकरच स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रांमध्ये हे वर्ग सुरू होणार आहेत. यात युपीएससी, एमपीएससी यासह बँकिंग, पोलिस, तलाठी, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा सर्व महत्त्वाच्या सरळसेवा भरती परीक्षांचा समावेश आहे. कामगार मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्या निर्देशानुसार सदर योजना सुरू करण्यात येत आहे. केंद्रांचे सविस्तर पत्ते मंडळाच्या www.mlwb.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.